# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission

MERC/ADM/RTI/012/2019/**128**

Dt. 22.02.2019

प्रति,
श्री. विलास बाबूराव काळे,
९७८, हरभट रोड,
काळेवाडा, सांगली,
पिनकोड - ४१६४१६.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २५.०१.२०१९ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ०८.०२.२०१९ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | बायोमास जनरेटींग प्रोजक्ट नी ॲक्टीव्ह पॉवरच्या ३६% इतकी रिॲक्टीव्ह पॉवर ग्रीड मध्ये आवश्यक आहे न केल्यास रू. ०.२५ पैसे इतका लाव जात असणाऱ्या पेनल्टी संबंधाती MERC Ruling.<br>MERC च्या कोणत्या आदेशाने अशी पेनाल्टी लावण्यात येते तो आदेश क्र. व त्याचा दिनांक याची माहिती मिळावी. | याबाबतची माहिती आयोगाचे आदेश दि. २९ एप्रिल, २०११ च्या प्रकरण 39 चा 2011 मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in OR www.mercindia.org.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे. |
| २ | सदर पेनाल्टी दि. १.०४.२०१० पुर्वी कार्यान्वीत झालेल्या प्रकल्पांना लागू होते काय याबाबत माहिती मिळावी. | माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (फ) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| | | कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.<br>आपण विचारलेली माहिती हि प्रश्नार्थक स्वरूपाची आहे. त्यानुसार सदर माहिती संदर्भात अपेक्षित उत्तर देणे जन माहिती अधिकाराच्या क्षेत्रात येत नाही. माहिती अधिकार कायद्याखाली नागरिकांना जी माहिती साधन स्वरूपात उपलब्ध होऊ शकते अशी माहिती मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे ज्या प्रश्नांची उत्तरे साधन स्वरूपात उपलब्ध नाही, त्या प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित नाही. (एच. के. बन्सल वि. एमटीएनएल, अपील क्र. पीबीए/06/155, दि. 25.09.2006) |

जर आपणांस प्रकरण क्र. ३९ चा २०११ चे संपूर्ण छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकुण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ७८ | २ | १५६ | अंदाजे रु. २००/- | ३५६/- |
| | | | एकूण रु. | **३५६/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम रू. १५६/- जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी) व प्रथम अपीलीय अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई-400005. टेलिफोन नं. 022 22163964/65/69 **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी